मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: 9834138482



# चऱ्होलीच्या विद्युत दाहिनीपासून आळंदी मेट्रोपर्यंत प्रशासनाला धारेवर

## महापालिका प्रशासनाला थेट जाब; विकासकामांच्या निविदांवरही गंभीर सवाल

» पिंपरी | प्रतिनिधी

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत माजी महापौर नितीन काळजे यांनी प्रभागातील पायाभूत सुविधा, वाढत्या लोकसंख्येचे प्रश्न, मेट्रो विस्तार आणि प्रशासकीय कारभारातील त्रुटींवरून प्रशासनाला चांगलेच धारेवर धरले. चऱ्होली परिसरातील रखडलेली विद्युत दाहिनी, भेडसावणारी वाहतूक कोंडी, समाविष्ट गावांमधील स्मशानभूमींचे प्रश्न आणि विकासकामांच्या निविदा प्रक्रियेतील पारदर्शकता या मुद्द्यांवर त्यांनी सभेचे लक्ष वेधत प्रशासनाकडे थेट जाब विचारला.**



सभेमध्ये बोलताना नितीन काळजे यांनी चऱ्होली स्मशानभूमीतील विद्युत दाहिनीचे काम मागील सहा ते सात महिन्यांपासून अर्धवट अवस्थेत बंद पडल्याचा मुद्दा ठामपणे उपस्थित केला. चऱ्होली, मोशी, दिघी या समाविष्ट गावांमध्ये लोकसंख्या अत्यंत वेगाने वाढत असून येथे घरांचे पर्याय उपलब्ध असल्याने नागरिकांचा ओढा अधिक आहे.

अशा परिस्थितीत मूलभूत सुविधा देणे पालिकेचे कर्तव्य असताना दोन-तीन वर्षांपूर्वी मंजूर झालेल्या आणि जागा उपलब्ध करून दिलेल्या विद्युत दाहिनीचे काम रखडणे चुकीचे असल्याचे त्यांनी सांगितले. हे अर्धवट काम तातडीने पूर्ण करण्याची मागणी करत त्यांनी दिघीसह शहरात नव्याने समाविष्ट झालेल्या भागांमधील स्मशानभूमी व दफनभूमींचे संपूर्ण सर्वेक्षण करून तेथील रस्त्यांच्या अडचणी दूर कराव्यात, अशी आग्रही उपसूचना मांडली. वाहतूक कोंडीच्या समस्येकडे लक्ष वेधताना त्यांनी प्रस्तावित मेट्रो मार्गावर भर दिला. सध्या पिंपरी ते निगडी भक्ती-शक्ती चौकापर्यंत मेट्रो नेण्याचे नियोजन होत असले, तरी भविष्याचा विचार करता पुणे-आळंदी मेट्रो मार्ग अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

आळंदीसाठी दररोज पीएमपीएमएलच्या सुमारे १५० हून अधिक बसेस धावत असल्याने प्रवाशांची संख्या प्रचंड आहे. त्यामुळे चऱ्होली-दिघी-मोशी परिसरातील वाढत्या नागरीकरणाचा विचार करून मेट्रोच्या डीपीआरमध्ये पुणे-आळंदी मार्गाचा प्राधान्याने समावेश करावा, अशी उपसूचना त्यांनी सभागृहात मांडली. याचबरोबर खाजगी शाळांच्या उभारणीवर पालिकेचा कोणताही अंकुश नसल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. पालिकेच्या आरक्षित जागेव्यतिरिक्त स्वतःच्या जागेवर शाळा बांधणाऱ्या खाजगी संस्था मनमानी पद्धतीने काम करतात व नियमांचे उल्लंघन करतात. त्यामुळे अशा खाजगी शाळांनाही महापालिकेची ना हरकत प्रमाणपत्र (एनओसी) दरवर्षी बंधनकारक करण्यात यावी, असा आग्रह त्यांनी धरला.

विकासकामांच्या वाटपाबाबत बोलताना त्यांनी क्षेत्रीय कार्यालय स्तरावर निविदा न काढता त्या प्रभागनिहाय काढण्याची मागणी केली. क्षेत्रीय पातळीवर कामे एकत्र दिल्याने कामांमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार आणि गफलत होत असून, एखाद्या प्रभागात कामे पूर्ण झाल्याचे भासवून इतर प्रभाग निधीपासून वंचित राहतात, असा गंभीर आरोप त्यांनी केला. विकासकामांत पारदर्शकता यावी आणि सर्व प्रभागांना समान न्याय मिळावा यासाठी प्रभागनिहाय वर्गीकरण करूनच निविदा प्रक्रिया राबवावी, अशी ठोस उपसूचना मांडत त्यांनी प्रशासकीय दिरंगाईवर तीव्र नाराजी व्यक्त केली.

### प्रशासनाला काळजे यांचा थेट सवाल!

चऱ्होलीतील रखडलेली विद्युत दाहिनी तातडीने पूर्ण करावी, समाविष्ट गावांतील स्मशानभूमी व दफनभूमींचे सर्वेक्षण करून रस्त्यांच्या समस्या सोडवाव्यात, वाढत्या नागरीकरणाचा विचार करून पुणे–आळंदी मेट्रो मार्गाचा डीपीआरमध्ये प्राधान्याने समावेश करावा, खाजगी शाळांना दरवर्षी महापालिकेची एनओसी बंधनकारक करावी तसेच विकासकामांच्या निविदा प्रभागनिहाय काढून प्रक्रियेत पारदर्शकता आणावी, अशी आक्रमक मागणी माजी महापौर नितीन काळजे यांनी केली.

# काळभोर नगरातील ५३ महिला बनल्या उद्योजकतेच्या दिशेने सक्षम!

» पिंपरी | प्रतिनिधी

**महिलांना कौशल्याधारित प्रशिक्षणाच्या माध्यमातून स्वावलंबी बनवून त्यांना उद्योजकतेच्या मुख्य प्रवाहात आणण्याच्या उद्देशाने काळभोर नगर येथे आयोजित करण्यात आलेल्या २६ दिवसीय सूक्ष्म कौशल्य उद्यमिता विकास कार्यक्रमाचा प्रमाणपत्र वितरण समारंभ उत्साहात संपन्न झाला. या प्रशिक्षणाचा लाभ ५३ महिलांनी घेतला.**



नगरसेविका वैशालीताई काळभोर, नगरसेवक प्रमोद कुटे, नगरसेविका अरुणाताई लंगोटे आणि युवा नेते विशाल काळभोर यांच्या पुढाकारातून भारतीय उद्यमिता विकास संस्थान (EDII), ॲक्सेंचर आणि WE-ACT यांच्या संयुक्त विद्यमाने, तसेच महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम), पुणे आणि दीपस्तंभ लोकसंचालित साधन केंद्र, भोर यांच्या सहकार्याने 'मिलेट्स प्रॉडक्ट्स – कुकीज, केक व मसाला प्रक्रिया' या विषयावर प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या प्रशिक्षणादरम्यान महिलांना मिलेट्सपासून विविध खाद्यपदार्थ तयार करणे, कुकीज व केक निर्मिती, मसाला प्रक्रिया यासह उद्योग उभारणी, उत्पादनाचे मार्केटिंग, बाजारपेठेशी जोडणी आणि व्यवसाय व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. कौशल्यासोबतच स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक आत्मविश्वास निर्माण करण्यावरही भर देण्यात आला.

महिला उद्योजिकांना प्रशिक्षण, मार्गदर्शन, उद्योग उभारणीसाठी सहाय्य, बाजारपेठेशी जोडणी आणि शाश्वत व्यवसायासाठी आवश्यक परिसंस्था उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नांचा हा उपक्रम महत्त्वपूर्ण टप्पा ठरला. प्रशिक्षणामुळे काळभोर नगरातील महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्यासाठी आणि स्वतःचा व्यवसाय उभारण्यासाठी नवी दिशा मिळाली.

प्रमाणपत्र वितरण समारंभाला विशाल काळभोर, अनुराधाताई काळभोर, माविम पुणेच्या अध्यक्ष श्वेता देवकर, उपाध्यक्ष सारिका जावळे, बाळासाहेब मुळे, सीएमआरसी भोसरीचे व्यवस्थापक निलेश साबळे, माविमच्या लेखापाल स्नेहल ठुबल, आकुर्डीच्या एरिया को-ऑर्डिनेटर ज्योती मुकेश हेळवे, भोसरीच्या एरिया को-ऑर्डिनेटर पल्लवी गुळवे, ट्रेनर अमृता गोडसे, सहयोगिनी मनीषा शिर्के, EDII चे प्रोजेक्ट ऑफिसर भगवान हरकळ तसेच मिशन स्वावलंबन लोकसंचालित साधन केंद्राचे कर्मचारी उपस्थित होते.

महिलांच्या कौशल्याला उद्योगाची जोड मिळाल्यास त्या स्वतःच्या पायावर उभ्या राहण्यासोबतच कुटुंबाच्या आर्थिक प्रगतीलाही हातभार लावू शकतात.

# मोशीकरांच्या हक्काच्या स्मशानभूमीसाठी निखिल बोऱ्हाडे आक्रमक!

## 'भूसंपादन तातडीने सुरू करा'; अंत्यसंस्कारासाठी जागाच उरण्याची भीती!

**पिंपरी | प्रतिनिधी**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या नुकत्याच झालेल्या सर्वसाधारण सभेत मोशी परिसरातील स्मशानभूमीचा गंभीर प्रश्न ऐरणीवर आला. भाजप नगरसेवक निखिल बोऱ्हाडे यांनी या प्रश्नावर आक्रमक भूमिका घेत, मोशी गावासाठी तातडीने भूसंपादन करून प्रशस्त व सुसज्ज स्मशानभूमी विकसित करण्याची मागणी महापालिका प्रशासनाकडे केली.**



सभागृहात बोलताना बोऱ्हाडे यांनी सांगितले की, मोशीकरांसाठी सध्या हक्काची आणि प्रशस्त स्मशानभूमी उपलब्ध नाही. मोशी गावासाठी स्मशानभूमीचे आरक्षण असलेल्या जागेबाबत न्यायालयीन खटला सुरू आहे. त्यामुळे न्यायालयीन प्रक्रियेची वाट पाहत न बसता महापालिका आयुक्त आणि संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांनी या जागेच्या भूसंपादनाची प्रक्रिया तातडीने हाती घ्यावी, अशी मागणी त्यांनी केली.

न्यायालयीन निकालानंतर संबंधित जागामालकाला नियमानुसार योग्य मोबदला दिला जाऊ शकतो. मात्र, वाढती लोकसंख्या आणि भविष्यातील गरजा लक्षात घेता प्रशासनाने आतापासूनच आवश्यक पावले उचलून स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध करून देणे गरजेचे असल्याचे बोऱ्हाडे यांनी स्पष्ट केले.

चऱ्होली, चिखली आणि भोसरी परिसरात महापालिकेने चांगल्या दर्जाच्या स्मशानभूमी उभारल्या असताना मोशी परिसरावर मात्र अन्याय का? असा सवाल उपस्थित करत बोऱ्हाडे यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले. मोशी परिसरात मोठ्या प्रमाणात नागरीकरण होत असून दिवसेंदिवस लोकसंख्या वाढत आहे. त्यामुळे नागरिकांच्या मूलभूत गरजांमध्ये स्मशानभूमीसारख्या सुविधेला प्राधान्य देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, नाशिक महामार्गाच्या प्रस्तावित कामामुळे सध्या अस्तित्वात असलेली स्मशानभूमीची जागा बाधित होण्याची शक्यता असल्याने परिस्थिती आणखी गंभीर होऊ शकते. महामार्गाचे काम पूर्ण झाल्यानंतर अंत्यसंस्कारासाठी आवश्यक जागेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याने प्रशासनाने कोणतीही दिरंगाई न करता पर्यायी आणि प्रशस्त जागेची व्यवस्था करावी, अशी मागणी त्यांनी केली.

मोशीकरांना मूलभूत सुविधा देण्याची जबाबदारी महापालिकेची असून, स्मशानभूमीसारख्या संवेदनशील विषयाकडे दुर्लक्ष करणे योग्य नाही. त्यामुळे महापौर आणि महापालिका प्रशासनाने या प्रश्नाचे गांभीर्य ओळखून तातडीने भूसंपादनासाठी आवश्यक आर्थिक तरतूद करावी आणि मोशीकरांना सुसज्ज, प्रशस्त व हक्काची स्मशानभूमी उपलब्ध करून द्यावी, अशी आग्रही मागणी नगरसेवक निखिल बोऱ्हाडे यांनी सर्वसाधारण सभेत केली.

### मोशीकरांसाठी प्रशस्त स्मशानभूमीची मागणी!

मोशी गावासाठी आरक्षित असलेल्या जागेचे न्यायालयीन प्रकरण सुरू असले तरी भूसंपादनाची प्रक्रिया तातडीने सुरू करावी, अशी मागणी नगरसेवक निखिल बोऱ्हाडे यांनी केली. नाशिक महामार्गाच्या कामामुळे सध्याची स्मशानभूमी बाधित होण्याची शक्यता असल्याने भविष्यात अंत्यसंस्कारासाठी जागेचा गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे महापालिका प्रशासनाने तातडीने आर्थिक तरतूद करून मोशीकरांना सुसज्ज व प्रशस्त स्मशानभूमी उपलब्ध करून द्यावी, अशी आग्रही मागणी त्यांनी सर्वसाधारण सभेत केली.

# थोरल्या पादुकांमागची जागा आता वारकरी संस्कृतीचे केंद्र बनवा!

**पिंपरी | प्रतिनिधी**

**आळंदी-पंढरपूर मार्गावरील थोरल्या पादुका, माऊली मंदिराच्या पाठीमागे असलेल्या मोकळ्या जागेचा नागरिक आणि भाविकांच्या हितासाठी नियोजनबद्ध विकास करावा, अशी आग्रही मागणी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे नगरसेवक सचिन श्रीधर तापकीर यांनी महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत केली.**



या मोकळ्या जागेचा योग्य वापर करून येथे आकर्षक उद्यान, लहान मुलांसाठी खेळण्यांची सुविधा तसेच महाराष्ट्राच्या समृद्ध वारकरी परंपरेचे दर्शन घडविणारे भव्य 'वारकरी साहित्य संग्रहालय' उभारावे, असा प्रस्ताव तापकीर यांनी प्रशासनासमोर मांडला.

तीर्थक्षेत्र आळंदी येथे राज्यभरातून मोठ्या संख्येने भाविक येत असतात. आळंदीतील संतसृष्टीला भेट देणाऱ्या भाविकांची संख्याही मोठी आहे. त्यामुळे थोरल्या पादुका परिसरातील या मोकळ्या जागेचा नियोजनबद्ध विकास केल्यास स्थानिक नागरिकांसाठी विरंगुळ्याचे हक्काचे ठिकाण उपलब्ध होण्याबरोबरच भाविकांसाठीही एक आकर्षणाचे केंद्र निर्माण होईल, असे तापकीर यांनी सांगितले.

वारकरी साहित्य, संतपरंपरा आणि महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाची ओळख नव्या पिढीला व्हावी, यासाठी या ठिकाणी साहित्य संग्रहालय उभारणे महत्त्वाचे ठरेल. संग्रहालयाच्या माध्यमातून संतांचे साहित्य, वारकरी संप्रदायाची परंपरा, वारीचा इतिहास आणि संतसाहित्याचा समृद्ध वारसा भाविक तसेच पर्यटकांना जवळून अनुभवता येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

यासोबतच उद्यान आणि बालोद्यान विकसित केल्यास परिसरातील नागरिकांना कुटुंबासह वेळ घालवण्यासाठी चांगली जागा उपलब्ध होईल. धार्मिक आणि सांस्कृतिक पर्यटनाला चालना देण्याच्या दृष्टीनेही या प्रकल्पाचा उपयोग होऊ शकतो.

त्यामुळे महापालिका प्रशासनाने या मोकळ्या जागेच्या विकासाचे नियोजन तातडीने हाती घेऊन वारकरी साहित्य संग्रहालय, आकर्षक उद्यान आणि बालोद्यान उभारावे, अशी आग्रही मागणी नगरसेवक सचिन तापकीर यांनी सर्वसाधारण सभेत केली.



# कचरा संकलनातील बोजवाऱ्यावर कविता भोंगाळे आक्रमक!

**पिंपरी | प्रतिनिधी**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात झालेल्या सर्वसाधारण सभेत प्रभाग क्रमांक ५ मधील कचरा संकलन आणि डंपिंगच्या प्रश्नावरून नगरसेविका कविता भोंगाळे यांनी प्रशासनाला चांगलेच धारेवर धरले.**

क्षेत्रीय कार्यालयाकडून तात्पुरते कचरा डंपिंगचे ठिकाण म्हणून संत गजानन महाराज मंदिर, गजानन महाराज नगर आणि पालखी मार्गालगतची जागा सांगण्यात आली आहे. मात्र, अशा महत्त्वाच्या ठिकाणी कचरा डंपिंगची जागा निश्चित करताना स्थानिक नगरसेवकांना विश्वासात घेतले गेले नाही, अशी नाराजी भोंगाळे यांनी व्यक्त केली.

या जागेबाबत रीतसर आक्षेप नोंदवून एक महिना उलटला असतानाही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही. धार्मिक स्थळ आणि पालखी-वारीच्या मार्गालगत कचरा डंपिंगची व्यवस्था करणे योग्य आहे का, असा सवाल उपस्थित करत त्यांनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त केली.

दरम्यान, प्रभागातील अंतर्गत भागात कचरा संकलन व्यवस्थेचा बोजवारा उडाल्याचा मुद्दाही त्यांनी सभागृहात मांडला. मोठ्या सोसायट्यांमध्ये ओला आणि सुका कचरा वर्गीकरण व्यवस्थित होत असले, तरी अरुंद रस्ते आणि छोट्या गल्लीबोळांमध्ये घंटागाड्या पोहोचत नसल्याने नागरिकांना मोठ्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. परिणामी अनेक ठिकाणी कचरा साचून दुर्गंधी आणि अस्वच्छतेची परिस्थिती निर्माण होत असल्याचे त्यांनी सांगितले.

विशेष म्हणजे, घंटागाडी न आल्याबाबत नागरिकांनी कर्मचाऱ्यांकडे विचारणा केल्यास 'तुमच्या गल्लीत गाडी आणल्यास आम्हाला उशीर होईल' अशा प्रकारची उडवाउडवीची उत्तरे दिली जात असल्याचा गंभीर मुद्दा भोंगाळे यांनी उपस्थित केला. नागरिकांच्या तक्रारी ऐकून घेण्याऐवजी त्यांच्याशी मुजोरपणे वागणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्रशासनाने लगाम घालण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# 50 दिवसांचा कचरा प्रश्न! माऊली जगतापांचा प्रशासनावर संताप

## NGT-MPCB अहवालांवरही प्रशासन गप्प; तातडीने कारवाईची मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

**शहरातील वाढत्या कचऱ्याच्या प्रश्नावरून आणि प्रशासनाच्या भूमिकेवर नगरसेवक ज्ञानेश्वर उर्फ माऊली जगताप यांनी तीव्र शब्दांत संताप व्यक्त केला आहे. निवडून आल्यानंतर नागरिकांच्या अपेक्षेनुसार कामे होणे अपेक्षित असताना, शहरात कचऱ्याचे प्रश्न दिवसेंदिवस वाढत चालले असल्याचे त्यांनी म्हटले आहे. पाण्याचे प्रश्न, कुत्र्यांचा त्रास आणि कचऱ्याची समस्या गंभीर रूप धारण करत आहे.**



कचऱ्याच्या प्रश्नी प्रशासनाचे लक्ष वेधत असताना, एनजीटी (NGT) तसेच एमपीसीबी (MPCB) यांच्या अहवालांमध्ये नमूद करण्यात आलेल्या महत्त्वाच्या मुद्द्यांकडेही प्रशासनाकडून सातत्याने दुर्लक्ष केले जात असल्याचा गंभीर आरोप माऊली जगताप यांनी केला आहे. कचरा व्यवस्थापनाच्या प्रश्नावर वारंवार प्रशासनाचे लक्ष वेधूनही ठोस उपाययोजना होत नसल्याने नागरिकांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे प्रशासनाने NGT आणि MPCBच्या अहवालांचा गांभीर्याने विचार करून त्यातील त्रुटी दूर करण्यासाठी तातडीने आवश्यक ती कार्यवाही करावी आणि शहरातील कचरा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावावा, अशी मागणी त्यांनी आयुक्तांकडे केली आहे.

तसेच, प्रत्येक प्रभागातील कचरा व्यवस्थापनासाठी स्वतंत्र आणि प्रभावी नियोजन करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. नगरसेवक, महापालिका अधिकारी आणि संबंधित प्रशासकीय यंत्रणांनी समन्वयाने काम करून कचरा संकलन, विलगीकरण आणि त्याची योग्य विल्हेवाट यावर भर देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. नागरिकांमध्येही कचरा विलगीकरणाबाबत जनजागृती करण्याची गरज आहे. मात्र, गेल्या ५० दिवसांपासून शहरातील कचऱ्याची परिस्थिती दिवसेंदिवस बिकट होत असताना प्रशासनाकडून टाळाटाळ केली जात असल्याने, आता केवळ आश्वासनांवर न थांबता प्रत्यक्ष उपाययोजना करण्यात याव्यात. प्रशासनाने या संपूर्ण प्रकरणावर तातडीने पावले उचलून कचरा व्यवस्थापनाबाबत स्पष्ट खुलासा करावा आणि निश्चित कालमर्यादेत परिस्थिती सुधारावी, अशी अपेक्षाही माऊली जगताप यांनी व्यक्त केली आहे.

### वेस्ट टू एनर्जी प्रकल्पाबाबत प्रश्नचिन्ह

शहरात सुरू असलेल्या 'वेस्ट टू एनर्जी' (WASTE TO ENERGY) प्रकल्पातील एका चिमणी कोसळल्याची बाब समोर येत असून, हा प्रकार कागदावरच लपवला जात असल्याचा संशय त्यांनी व्यक्त केला आहे. हा प्रकल्प नेमका किती दिवस बंद राहणार? यावर प्रशासनाने काय कारवाई केली? या प्रकल्पाला किती दंड ठोठावण्यात आला? आणि हा प्रकल्प पूर्ववत कधी सुरू होणार? या सर्व प्रश्नांची उत्तरे प्रशासनाने द्यावीत, अशी आक्रमक मागणी नगरसेवक ज्ञानेश्वर जगताप यांनी केली आहे.

# स्मशानभूमीच्या दुरवस्थेवर उदय गायकवाड आक्रमक!

**पिंपरी | प्रतिनिधी**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या नुकत्याच पार पडलेल्या सर्वसाधारण सभेत नगरसेवक उदय गायकवाड यांनी आपल्या परिसरातील स्मशानभूमीच्या दुरवस्थेचा मुद्दा अत्यंत आक्रमकपणे मांडत प्रशासनाचे लक्ष वेधले. गेली अनेक वर्षे संबंधित स्मशानभूमी महापालिकेकडून उपेक्षित राहिली असून, केवळ डागडुजी आणि ठिगळ लावण्याचे काम प्रशासनाकडून सुरू असल्याचा थेट आरोप त्यांनी यावेळी केला.**



महापालिकेने गेल्या वीस वर्षांत पत्रे बदलण्याव्यतिरिक्त कोणतेही भरीव काम येथे केलेले नसून जुने स्ट्रक्चरही कंपनीने उभारून दिलेलेच वापरले जात असल्याची वस्तुस्थिती त्यांनी सभागृहासमोर मांडली. त्यामुळे केवळ नावापुरते काम न करता सर्व सुविधांनी सुसज्ज अशा विकसित स्मशानभूमीची निर्मिती करावी, अशी आग्रही मागणी त्यांनी महापौरांकडे केली.

सदर स्मशानभूमी मुख्य रस्त्याला लागून असल्याने अंत्यविधीच्या वेळी या भागात मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी निर्माण होते, या गंभीर समस्येकडेही गायकवाड यांनी सभागृहाचे लक्ष वेधले. या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी स्मशानभूमीला लागून असलेल्या बस टर्मिनलच्या आरक्षणाचा (आरक्षण क्र. BT 6/231) योग्य वापर करण्याची सूचना त्यांनी मांडली.

सध्या या परिसरात बस टर्मिनलची आवश्यकता नसल्याने बस टर्मिनल आणि स्मशानभूमी या दोन्ही जागांचे आरक्षण एकत्र करून त्या ठिकाणी सुसज्ज, प्रशस्त आणि निसर्गरम्य स्मशानभूमी उभारावी, असा प्रस्ताव त्यांनी ठेवला. हे दोन्ही भूखंड एकत्र केल्यास नागरिकांना पुरेशा प्रमाणात वाहन पार्किंगसाठी मोकळी जागा उपलब्ध होईल, तसेच सर्व आधुनिक सुविधांसह विद्युत दाहिनीची उभारणी करणे शक्य होईल, असे गायकवाड यांनी स्पष्ट केले. समाविष्ट गावांमधील नागरी सुविधांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याची नाराजी व्यक्त करत, प्रशासनाने या विषयाचे गांभीर्य ओळखून लवकरात लवकर ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली.



# बंद पडलेला लेझर शो तलावात हलवा! सागर गवळींची प्रशासनाकडे मागणी!

**पिंपरी | प्रतिनिधी**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत नगरसेवक सागर गवळी यांनी शहरातील पर्यटन आणि सुशोभीकरणाच्या अनुषंगाने महत्त्वपूर्ण प्रश्न उपस्थित केला. निगडी येथील अप्पूघरच्या पुनर्विकासाबाबत बोलताना त्यांनी नमूद केले की, अप्पूघरचा प्रकल्प नेमका कसा असणार आहे याचे सादरीकरण सर्व नगरसेवकांना दाखवण्यात यावे.**

याचबरोबर भोसरी येथील सहल केंद्राच्या विकासाकडे लक्ष वेधताना ते म्हणाले की, कै. अंकुशराव लांडगे यांच्या संकल्पनेतून साकारलेले भोसरी गावातील सहल केंद्र हे नागरिकांचे प्रमुख आकर्षण केंद्र आहे. या ठिकाणी भव्य ध्यान मंदिर, सुंदर उद्यान आणि लहान मुलांच्या मनोरंजनासाठी खेळणी उपलब्ध आहेत.

मात्र, सकुबाई गवळी उद्यानामध्ये २०१२ ते २०१७ दरम्यान सुरू करण्यात आलेला संगीतमय लेझर शो बऱ्याच काळापासून बंद अवस्थेत पडून आहे. हा बंद पडलेला लेझर शो भोसरी सहल केंद्रातील तलावामध्ये स्थलांतरित करून पुन्हा सुरू करण्यात यावा, जेणेकरून पाण्याचा अपव्यय टळेल आणि तलावाचे सुशोभीकरण होऊन परिसराच्या वैभवात भर पडेल. प्रशासनाने या विषयाची तातडीने दखल घेऊन सकुबाई गवळी उद्यानातील लेझर शो भोसरी तलावात कार्यान्वित करावा, अशी आग्रही मागणी गवळी यांनी महापौर व सभागृहाकडे केली.

# मोशी दुर्घटनेतील मृत कामगारांना नोकरी-घर द्या! सारिका गायकवाड आक्रमक

## महापालिकेत वारसांना कायमस्वरूपी नोकरी आणि प्रधानमंत्री आवास योजनेतून पक्क्या घराची मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत मोशी येथे कचऱ्याचा ढीग कोसळून झालेल्या भीषण दुर्घटनेत नऊ कष्टकरी कामगारांचा मृत्यू झाल्याचा मुद्दा चांगलाच गाजला. नगरसेविका सारिका गायकवाड यांनी या दुर्घटनेचा तीव्र शब्दांत निषेध नोंदवत मृत कामगारांच्या कुटुंबीयांना तातडीने न्याय आणि आधार देण्याची मागणी केली. कामाच्या ठिकाणी ढिगारा घसरून इमारतीवर कोसळल्याने नऊ कामगारांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे संबंधित कुटुंबांवर मोठे संकट कोसळले असून, कुटुंबाचा उदरनिर्वाह करणारे सदस्य गमावल्याने त्यांच्या भवितव्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.**



### नऊ कुटुंबांचा आधार हिरावला!

मोशीतील भीषण दुर्घटनेत नऊ कष्टकरी कामगारांचा दुर्दैवी मृत्यू; कुटुंबातील कर्ता व्यक्ती गमावल्याने वारसांवर उदरनिर्वाहाचे मोठे संकट; मृत कामगारांच्या कुटुंबातील प्रत्येकी एका वारसाला पिंपरी-चिंचवड महापालिकेत कायमस्वरूपी नोकरी देण्याची आग्रही मागणी; मृत कामगारांचे हक्काचे घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत चऱ्होली अथवा महापालिका क्षेत्रातील इतर गृहप्रकल्पातून प्रत्येक बाधित कुटुंबाला पक्के घर देण्याचा प्रस्ताव.

या पार्श्वभूमीवर सारिका गायकवाड यांनी महापालिका प्रशासनाकडे महत्त्वपूर्ण मागण्या मांडल्या. दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या नऊही कामगारांच्या वारसांना किंवा त्यांच्या कुटुंबातील प्रत्येकी एका व्यक्तीला पिंपरी-चिंचवड महापालिकेत कायमस्वरूपी नोकरी देण्यात यावी, अशी आग्रही मागणी त्यांनी केली. तसेच प्रत्येक कष्टकरी कुटुंबाचे हक्काचे घर असावे, हे स्वप्न असते. मात्र, या दुर्घटनेत मृत्यू झालेल्या कामगारांचे हे स्वप्न अपूर्ण राहिले आहे. त्यामुळे त्यांच्या कुटुंबीयांना प्रधानमंत्री आवास योजना (घरकुल) अंतर्गत चऱ्होली अथवा महापालिका क्षेत्रातील इतर गृहप्रकल्पातून प्रत्येकी एक पक्के घर देण्यात यावे, अशी मागणी त्यांनी केली.

स्थानिक आमदार महेशदादा लांडगे तसेच दिघी-चऱ्होली भागातील सर्व नगरसेवकांच्या वतीने सभागृहात ही अधिकृत उपसूचना मांडण्यात येत असल्याचेही सारिका गायकवाड यांनी स्पष्ट केले. प्रशासन आणि महापौरांनी या उपसूचनेचा तातडीने स्वीकार करून केवळ आर्थिक मदतीपुरते मर्यादित न राहता मृत कामगारांच्या कुटुंबीयांच्या रोजगार आणि निवाऱ्याची कायमस्वरूपी व्यवस्था करावी, अशी मागणी त्यांनी केली. या दुर्घटनेतील पीडित कुटुंबांना मानवतावादी दृष्टिकोनातून तत्काळ न्याय मिळवून देण्यासाठी महापालिका प्रशासनाने संवेदनशीलतेने निर्णय घ्यावा, अशी भूमिका त्यांनी सभागृहात ठामपणे मांडली.

# त्रिवेणीनगर-तळवडे रस्त्यावरील अपघातांवरून प्रवीण भालेकर आक्रमक!

**पिंपरी | प्रतिनिधी**

**महापालिकेला दरवर्षी सुमारे १५ कोटी रुपयांचा कर देऊनही रेड झोनच्या नावाखाली विकासकामांपासून वंचित ठेवणे अत्यंत अन्यायकारक असून पायाभूत सुविधांअभावी रस्ते थेट मृत्यूचे सापळे बनत असल्याचा घणाघाती आरोप नगरसेवक प्रवीण भालेकर यांनी केला. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत ते प्रभागातील गंभीर समस्या मांडताना बोलत होते. यावेळी त्यांनी महापौरांचे थेट लक्ष वेधत प्रभागातील प्रलंबित विकासकामे, अपूर्ण डीपी रस्ते आणि वाढत्या अपघातांच्या समस्येवर स्वतंत्र बैठक घेऊन तातडीने तोडगा काढण्याची आग्रही मागणी केली.**



### रेड झोनच्या नावाखाली सुविधा रोखू नका!

रेड झोनच्या नावाखाली नागरिकांना विकासकामांपासून वंचित ठेवणे अन्यायकारक; महापालिकेला दरवर्षी तब्बल १५ कोटी रुपयांचा कर देऊनही रस्ते, ड्रेनेज व मूलभूत सुविधांची वानवा; त्रिवेणीनगर-तळवडे रस्त्यावर वाढत्या अपघातांमुळे नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर; अपूर्ण डीपी रस्त्यांची कामे तातडीने हाती घेण्याची मागणी; भूसंपादन आणि कमी रेडीरेकनर दरांमुळे रखडलेली विकासकामे मार्गी लावण्यासाठी महापौरांच्या उपस्थितीत विशेष बैठक घेण्याची मागणी.

महापालिकेचा महत्त्वाकांक्षी असा देशात दुसऱ्या-तिसऱ्या क्रमांकावर असलेला बायोडायव्हर्सिटी पार्क हा ड्रिम प्रोजेक्ट निधीअभावी रखडला असून सद्यस्थितीत तिथे पुरेशा निधीची उपलब्धता नाही, अशी खंत भालेकर यांनी सुरुवातीला व्यक्त केली. पुढे बोलताना त्यांनी रेड झोनच्या नियमांमुळे प्रभागातील नागरिकांची होत असलेली ससेहोलपट सभागृहासमोर मांडली. प्रभागातील बहुतांश भाग रेड झोनमध्ये येत असल्याचे कारण सांगून प्रत्येक वेळी विकासकामे टाळली जातात. मात्र, असे असतानाही याच भागातून महापालिकेच्या तिजोरीत तब्बल १५ कोटी रुपयांचा कर जमा होत आहे. करवसुली सुरळीत सुरू असताना नागरिकांना मात्र रस्ते, ड्रेनेज आणि मूलभूत सुविधांसाठी झगडावे लागत आहे.

सध्याच्या रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे नागरिकांचे जीव धोक्यात आले असून त्रिवेणीनगर-तळवडे रस्त्यावर नुकताच चार दिवसांपूर्वी झालेल्या भीषण अपघातात एका दाम्पत्याला जागीच जीव गमवावा लागल्याची धक्कादायक घटना त्यांनी सभागृहात निदर्शनास आणून दिली. हा रस्ता आता अपघातांचा केंद्रबिंदू ठरत असून नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी डीपी रस्त्यांची कामे तातडीने हाती घेणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. रेड झोनमुळे परिसरातील रेडीरेकनरचे दर अत्यंत कमी आहेत; रेड झोनबाहेरील दर दुप्पट असताना इथे एफएसआय आणि टीडीआर कमी मिळत असल्याने भूसंपादन रखडत आहे आणि विकासकामे मार्गी लागत नाहीत. भोसरी मतदारसंघाच्या आमदारांनी देखील हा प्रश्न विधानसभेत उपस्थित करून रेडीरेकनरचे दर वाढवण्याची मागणी केली आहे. त्यामुळे स्थानिक पातळीवर महापालिका प्रशासनाने गांभीर्याने लक्ष घालून, महापौरांच्या उपस्थितीत स्वतंत्र विशेष बैठक आयोजित करावी आणि डीपी रस्त्यांसह मूलभूत नागरी सुविधांचा प्रश्न लवकरात लवकर निकाली काढावा, अशी मागणी प्रवीण भालेकर यांनी केली.

# सांगवीत कचऱ्याचे डोंगर; पल्लवी जगताप आक्रमक!

## घंटागाड्यांचा बोजवारा; जीपीएस अन् ठेकेदारांवर कारवाईची मागणी!

» पिंपरी | प्रतिनिधी

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत सांगवी परिसरातील वाढत्या कचरा समस्येवरून नगरसेविका पल्लवी जगताप यांनी प्रशासनाला धारेवर धरले. वेळेवर घंटागाड्या उपलब्ध होत नसल्याने नागरिकांना रस्त्याच्या कडेला कचरा टाकण्याची वेळ येत असून, त्यामुळे सांगवी परिसरात गल्लोगल्ली कचऱ्याचे साम्राज्य निर्माण झाल्याचा आरोप त्यांनी केला.**



सांगवी येथील कचरा संकलन केंद्रात मोठ्या प्रमाणात कचरा साचल्याने तेथे कचऱ्याचे अक्षरशः डोंगर उभे राहिले आहेत. या कचऱ्यामुळे परिसरात तीव्र दुर्गंधी पसरली असून, नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. विशेषतः संध्याकाळच्या वेळी ज्येष्ठ नागरिक शुद्ध हवेसाठी, तर लहान मुले खेळण्यासाठी घराबाहेर पडतात. मात्र, कचऱ्याच्या दुर्गंधीमुळे त्यांना दूषित आणि प्रदूषित हवेत राहावे लागत असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला असल्याचे जगताप यांनी सभेत निदर्शनास आणून दिले.

कचरा संकलनाची व्यवस्था सुरळीत करण्यासाठी केवळ तात्पुरत्या उपाययोजना न करता कायमस्वरूपी आणि ठोस व्यवस्था उभारण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सांगवीतील प्रत्येक भागासाठी घंटागाडी येण्याची निश्चित वेळ जाहीर करावी आणि त्या वेळेनुसार नियमितपणे कचरा गाडी उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी त्यांनी केली.

तसेच कचरा संकलन करणाऱ्या सर्व गाड्यांवर जीपीएस यंत्रणा बसवून त्यांच्या फेऱ्यांवर महापालिका प्रशासनाने थेट नियंत्रण ठेवावे, अशी मागणीही त्यांनी केली. कोणत्या भागात गाडी गेली, किती वेळ थांबली आणि कचरा संकलन झाले की नाही, याची माहिती प्रशासनाला तत्काळ उपलब्ध होण्यासाठी जीपीएस प्रणाली उपयुक्त ठरेल, असे त्यांनी सांगितले.

### कचरा व्यवस्थेला शिस्त लावा; जगतापांची मागणी!

सांगवीतील प्रत्येक भागासाठी घंटागाडीची निश्चित वेळ जाहीर करून नियमित कचरा संकलन करावे, सर्व कचरा गाड्यांवर जीपीएस यंत्रणा बसवून त्यांच्या फेऱ्यांवर प्रशासनाने देखरेख ठेवावी, गाडी बंद पडल्यास पर्यायी गाडी तातडीने उपलब्ध करावी आणि ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळे कचरा उचलला न गेल्यास संबंधित ठेकेदारावर कठोर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी नगरसेविका पल्लवी जगताप यांनी केली.

एखादी घंटागाडी अचानक बंद पडल्यास नागरिकांना कचरा साठवून ठेवण्याची वेळ येऊ नये, यासाठी पर्यायी गाडी तत्काळ उपलब्ध ठेवण्याची यंत्रणा तयार करावी, अशी मागणी जगताप यांनी केली. तसेच ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळे एखाद्या भागातील कचरा उचलला गेला नाही, तर संबंधित ठेकेदारावर कठोर दंडात्मक कारवाई करण्यात यावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, सांगवीकरांना दुर्गंधीमुक्त, स्वच्छ आणि सुरक्षित परिसर मिळणे हा त्यांचा मूलभूत अधिकार आहे. त्यामुळे महापौर आणि महापालिका आयुक्तांनी सांगवीतील कचरा समस्येचे गांभीर्य ओळखून तातडीने हस्तक्षेप करावा आणि नागरिकांना वारंवार त्याच समस्येला सामोरे जाण्याची वेळ येणार नाही, यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, असे आवाहन नगरसेविका पल्लवी जगताप यांनी केले.

# देहू-आळंदी मेट्रोसाठी यश साने यांचे महा मेट्रोला साकडे!

» पिंपरी | प्रतिनिधी

**देहू ते आळंदी या महत्त्वपूर्ण मार्गावर मेट्रो सेवा सुरू करण्यात यावी, या मागणीसाठी नगरसेवक यश साने यांच्यासह चिखली परिसरातील ज्येष्ठ नागरिकांच्या शिष्टमंडळाने महा मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांची भेट घेतली. यावेळी देहू-आळंदी मेट्रो मार्गाच्या प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.**



या शिष्टमंडळामध्ये ज्येष्ठ ग्रामस्थ अमृतआप्पा सोनवणे, प्रदीप भाऊ आहेर, निवृत्ती शेलार, विष्णु मोरे पाटील, बाळासाहेब मोरे, बाळासाहेब साने, मोहन ढोळ आणि रामभाऊ मोरे यांचा समावेश होता. बैठकीदरम्यान देहू-आळंदी मेट्रो मार्गाची आवश्यकता, त्याचे भविष्यातील महत्त्व तसेच या मार्गामुळे परिसरातील नागरिक, विद्यार्थी, नोकरदार, व्यावसायिक आणि भाविकांना होणाऱ्या विविध फायद्यांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. देहू आणि आळंदी ही संत तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली दोन प्रमुख तीर्थक्षेत्रे असून, दरवर्षी देशभरातून मोठ्या संख्येने भाविक येथे येत असतात. त्यामुळे या दोन्ही तीर्थक्षेत्रांना मेट्रोच्या माध्यमातून जोडल्यास नागरिकांसह भाविकांच्या प्रवासाला मोठी सुविधा मिळणार असल्याचे शिष्टमंडळाने निदर्शनास आणून दिले.

देहू-आळंदी मेट्रो मार्ग सुरू झाल्यास या परिसरातील वाढती वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल. सध्या रस्ते वाहतुकीवर मोठ्या प्रमाणात अवलंबून असलेल्या नागरिकांना जलद, सुरक्षित आणि आरामदायी सार्वजनिक वाहतुकीचा पर्याय उपलब्ध होईल. विशेषतः धार्मिक उत्सव, आषाढी-कार्तिकी वारी, संत तुकाराम महाराज पालखी सोहळा आणि संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्याच्या काळात या मार्गाचे महत्त्व अधिक वाढणार आहे. मेट्रोमुळे भाविकांना तसेच स्थानिक नागरिकांना कमी वेळेत आणि सुरक्षितपणे देहू व आळंदी दरम्यान प्रवास करता येणार असून, वाहतुकीवरील ताणही मोठ्या प्रमाणात कमी होण्याची शक्यता आहे.

याशिवाय या मेट्रो मार्गामुळे देहू-आळंदी परिसरातील पर्यटन, धार्मिक स्थळे, स्थानिक व्यवसाय आणि रोजगाराच्या संधींनाही चालना मिळू शकते. दोन्ही तीर्थक्षेत्रांना आधुनिक सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेने जोडल्यास परिसराचा नियोजित आणि सर्वांगीण विकास होण्यास मदत होईल, असा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला. वाढती लोकसंख्या, औद्योगिक व निवासी विस्तार आणि भविष्यातील वाढणाऱ्या वाहतुकीच्या गरजा लक्षात घेता आतापासूनच सक्षम सार्वजनिक वाहतूक व्यवस्था उभारणे आवश्यक असल्याचेही शिष्टमंडळाने सांगितले.

या मागणीचा महा मेट्रो प्रशासनाकडून सकारात्मक विचार करण्यात येईल, असे आश्वासन महा मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी दिल्याचे शिष्टमंडळाने सांगितले. बैठकीनंतर उपस्थित नागरिकांनी सध्या सुरू असलेल्या मेट्रो प्रकल्पाची माहिती घेतली. तसेच प्रत्यक्ष मेट्रो प्रवासाचा अनुभव घेत प्रकल्पाची कार्यपद्धती, प्रवाशांसाठी उपलब्ध सुविधा आणि भविष्यातील मेट्रो नेटवर्कबाबत माहिती जाणून घेतली.

देहू आणि आळंदी या धार्मिक, ऐतिहासिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाच्या शहरांना मेट्रोने जोडणे ही केवळ वाहतुकीची गरज नसून, संपूर्ण परिसराच्या विकासाला नवी दिशा देणारी बाब ठरू शकते. या मार्गामुळे हजारो स्थानिक नागरिकांसह दरवर्षी येणाऱ्या लाखो भाविकांना मोठा दिलासा मिळणार असून, देहू-आळंदी परिसर अधिक सक्षम, गतिमान आणि आधुनिक सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेशी जोडला जाणार असल्याची अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली.